तरुण भारत मंगळवार, १७ डिसेंबर २०२४

# सैनिकांच्या त्याग वृत्तीमुळे भारताचे सार्वभौमत्व टिकून

■ कर्नल देशपांडे यांचे मत

प्रतिनिधी

कोल्हापूर

भारतीय सैनिकांचे निरनिराळ्या युद्धजन्य परिस्थितीत केलेलं कार्य हे साहस आणि वीरतेचे प्रमाण आहे. सैनिकांच्या या अखंड त्याग वृत्तीमुळे भारताचे सार्वभौमत्व हे चिरंतन टिकून आहे, असे मत कर्नल देशपांडे यांनी व्यक्त केले.

विवेकानंद महाविद्यालयात भारत पाकिस्तान १९७१ युद्धाच्या स्मृतिदिनी विजय दिनाचे औचित्य साधून माजी सैनिक सन्मान सोहळा आयोजित केला होता. याप्रसंगी ते बोलत होते.

प्रा. संजय थोराम म्हणाले, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आणि विवेकानंद कॉलेज हे थोर स्वातंत्र्यसैनिक परमपूज्य शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या अथक प्रयत्नातून उभारले गेले असल्याने देशसेवा आणि अखंडतेचा संस्कार विद्यार्थ्यांमध्ये सदैव बाणविला जातो.

सैनिक सन्मान कार्यक्रमात १९६२, १९६५, १९७१ च्या युद्धातील आणि त्यानंतरच्या युद्धजन्य स्थितीत अतुलनीय कामगिरी बजाविणाऱ्या भारतीय सैनिकांचा गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम सैनिक कल्याण फेडरेशन कोल्हापूर आणि आयक्युएसी सेल मार्फत आयोजित केला होता. कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण २५० युद्ध सैनिक उपस्थित होते. युद्धजन्य परिस्थितीत साहसी वृत्तीने पराक्रम बजाविणाऱ्या कर्नल विजय गायकवाड, कॅप्टन एन. एन. पाटील, कॉपोरिल एम. डी. देसाई, सीपीओ पठाडे, सीईपी पृथ्वीराज देसाई, कॅप्टन चव्हाण, कॅप्टन कांबळे यांचा सन्मानपत्र आणि मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. अमर जवान स्मृतीस कर्नल देशपांडे यांच्या हस्ते पुष्पचक्र वाहून अभिवादन करण्यात आले.



कोल्हापूर : अमर जवानांच्या स्मृतीस पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करताना मान्यवर, एनसीसी विद्यार्थी.

प्रास्ताविक लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. स्वागत बी. टी. पाटील यांनी केले. आभार मेजर सुनिता भोसले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रम प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ श्रुती जोशी, कर्नल मानस दीक्षित, कर्नल संधान मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला. शहाजी कॉलेज, न्यू कॉलेज, छत्रपती शाहू कॉलेज, महावीर कॉलेज, कमला कॉलेज, कॉमर्स कॉलेजमधील एनसीसीचे विद्यार्थी उपस्थित होते.

# सैनिकांच्या त्यागामुळे भारताचे सार्वभौमत्व चिरंतन

## कर्नल देशपांडे : सैनिक फेडरेशनतर्फे विजय दिवस सन्मान सोहळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय सैन्य दलामुळे देशाचे ऐक्य आणि अखंडता टिकून आहे. इतकेच नव्हे, तर त्यांच्यामुळेच आपण सुरक्षित नागरिक असून, भारत महासत्ता म्हणून उदयास आला आहे. सैनिकांच्या या त्याग वृत्तीमुळे भारताचे सार्वभौमत्व हे चिरंतन आहे, असे प्रतिपादन कर्नल आर. एन. देशपांडे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रा. संजय थोरात होते.



**कोल्हापूर : विजय दिवस (१६ डिसेंबर) निमित्त शहीद जवानांना पुष्पचक्र अर्पण करताना सैन्यदलातील आजी-माजी अधिकारी-सैनिक, एनसीसी छात्र व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी.**

१६ डिसेंबर १९७१ च्या भारत - पाक युद्धात भारतीय सैनिकांनी पराक्रमाची शर्थ करून विजय मिळविला. या विजयाबद्दल भारतीय सैन्य दलातर्फे दि. १६ डिसेंबर हा दिवस दरवर्षी विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने कोल्हापुरातील सैनिक फेडरेशनच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व आय.क्यू.ए.सी. सेलच्या सहकार्याने विवेकानंद कॉलेजमध्ये सोमवारी हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमात १९६२, १९६५ व १९७१ युद्धांतील आणि त्यानंतरच्या युद्धजन्य स्थितीमधील अतुलनीय कामगिरी बजाविणाऱ्या भारतीय सैनिकांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील २५० युद्ध सैनिक उपस्थित होते. प्रास्ताविक लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी, स्वागत फेडरेशनचे अध्यक्ष बी. टी. पाटील यांनी, तर आभार मेजर सुनीता भोसले यांनी मानले. सूत्रसंचालन प्राध्यापक विश्वंभर कुलकर्णी यांनी केले.

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार, १७ डिसेंबर २०२४

# सैनिकांमुळे सार्वभौमत्व टिकून

## कर्नल देशपांडे : विजयदिनी माजी सैनिकांचा सन्मान

कोल्हापूर, ता. १६ : 'देशाचे ऐक्य आणि अखंडता टिकविण्यासाठी भारतीय स्थलसेना, नौसेना, वायूसेनेच्या सैनिकांनी आणि अधिकाऱ्यांनी केलेल्या अतुल्य पराक्रमामुळे आज आपण अखंड विश्वात सुरक्षित नागरिक आणि महासत्ता म्हणून उदयास आलो आहोत. भारतीय सैनिकांचे निरनिराळ्या युद्धजन्य परिस्थितीत केलेले कार्य हे साहस, वीरतेप्रमाणे आहे. सैनिकांच्या या अखंड त्याग वृत्तीमुळे भारताचे सार्वभौमत्व चिरंतन टिकून आहे,' असे गौरवोद्‌गार कर्नल आर. एन. देशपांडे यांनी केले.

भारत-पाकिस्तानमधील १९७१ युद्धाच्या विजय दिनानिमित्त विवेकानंद महाविद्यालय, सैनिक फेडरेशनतर्फे विवेकानंद महाविद्यालयातील डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवनात १९६२, १९६५, १९७१ च्या युद्धातील आणि त्यानंतरच्या युद्धजन्य स्थितीमधील अतुलनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिकांचा हा सन्मान सोहळा झाला. यावेळी कर्नल देशपांडे बोलत होते. सैनिक फेडरेशन, आयक्यूएसी सेलतर्फे आयोजन केले. कोल्हापूर जिल्ह्यातील २५० माजी सैनिक उपस्थित होते. कर्नल विजय गायकवाड, कॅप्टन एन. एन. पाटील, कॉर्पोरल एम. डी. देसाई, सीपीओ पठाडे, सीईपी पृथ्वीराज देसाई, कॅप्टन चव्हाण, कॅप्टन कांबळे यांना विवेकानंद महाविद्यालयातर्फे सन्मानपत्र, मानचिन्ह देऊन सन्मानित केले.

प्रा. संजय थोरात म्हणाले, 'विवेकानंद शिक्षण संस्था, विवेकानंद कॉलेज हे थोर स्वातंत्र्यसैनिक शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या अथक प्रयत्नांतून उभारले गेले असल्याने देशसेवा, अखंडतेचा संस्कार विद्यार्थ्यांमध्ये सदैव बाणविला जातो.'

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. डॉ. श्रुती जोशी, कर्नल मानस दीक्षित, कर्नल संधान मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केले. यावेळी शहाजी कॉलेज, न्यू कॉलेज, छत्रपती शाहू कॉलेज, कॉमर्स कॉलेजमधील एनसीसी छात्र उपस्थित होते. लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी प्रास्ताविक केले. फेडरेशनचे अध्यक्ष बी. टी. पाटील यांनी स्वागत केले. प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. मेजर सुनीता भोसले यांनी आभार मानले.

### अभूतपूर्व सोहळा

**सैनिक फेडरेशनने जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांना एकत्रित आणून हा सोहळा यशस्वी केला. चीन, पाकिस्तान, गोवा मुक्तिसंग्रामात ज्या सैनिकांनी भारतासाठी विजय अक्षरशः खेचून आणला, त्या माजी सैनिकांना प्रत्यक्ष पाहता आले. अनेकांचे वय आज ८०, ८४, ९४ वर्षे आहे; पण ते आपल्या नातेवाइकांबरोबर सोहळ्यासाठी आले. युद्धातील रणसंग्रामाचा थरार त्यांनी उपस्थितांसमोर कथन केला.**

17/12/2024